MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

April To June 2021
Issue 38, Vol-06

Date of Publication
01 May 2021

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

SHIVAJI COLLEGE HINGOLI

T.C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS)



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | April To June 2021 Issue-38, Vol-06 | 09

||74
||77
||82
||90
|95
'104
106
10
17
9

27) डॉ बाबासाहेब आंबेडकर : एक शाश्वत ज्ञानशास्त्र
डॉ. सुनंदा रामचंद्र भुसारे, हिंगोली ||133

28) कृषीविधेयक—२०२० आणि शेतकरी आंदोलनाचाएक चिकित्सक अभ्यास
प्रा. डॉ. मधूकर बाबूराव अनंतकवळस, जि. सोलापूर ||136

29) विस्थापन आणि दारिद्र्य
दलित सुभाषराव कांबळे, प्रा. डॉ. दीपक सु. धारवाडकर, सेनगांव ||144

30) परभणी जिल्हयातील तांदूळ उत्पादकतेचा भौगोलिक अभ्यास
डॉ. पाटील बी.टी., मुखेड ||146

31) ग्रामीण भागातील मुलीचा आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षणावर होणारा परिणाम
श्रीमती प्रभाबाई सर्जेराव पाटील, चाळीसगाव ||148

32) भारतीय अर्थव्यवस्थेत 'पिक विमा योजनेची भूमिका व आवश्यकता
प्रा. धनराज ईस्तारी घुबडे, प्रा. प्रशांत जगदिश वाल्देव, भंडारा ||152

33) महाराष्ट्रातील जिल्हा निहाय नागरीकरणात झालेली वाढ एक सांखिकी विश्लेषण
प्रा. डॉ. आर.एम. वाडीले, जिल्हा, धुळे ||155

34) खानदेशातील बंजारा लोकसंस्कृतीतील धार्मिक उपासक
प्रा.डॉ. रमाकांत अंबादास चौधरी, जि. धुळे ||158

35) सूचना प्रौद्योगिकी का इतिहास एवं वर्तमान
पूरन अहरवार, जबलपुर ||160

36) बाल्यावस्था में कुपोषण एक गम्भीर समस्या
Mamta Chouhan, Sandhya Gajbhiya, Chhindwara(M.P.) ||162

37) चित्रा मुद्गल के कथा साहित्य में आधुनिकता बोध
डॉ. कल्पना पाटील, जि. जलगाँव ||166

38) आदि जाति की लोक परंपरा
सम्यक रमेशचंद्र पारेख, डॉ. अश्विनी कुमार सिंह, डॉ. राजेश केलकर ||169

39) शिमला समझौता एवं विभिन्न राजनैतिक सुझाव
डॉ. शालिनी राय, अशोक नगर (म.प्र.) ||173

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



SHIVAJI COLLEGE HINGOLI
T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
& Dist. Hingoli (MS.)
Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | April To June 2021 Issue-38, Vol-06 | 0133

27

# डॉ बाबासाहेब आंबेडकर : एक शाश्वत ज्ञानशास्त्र

डॉ. सुनंदा रामचंद्र भुसारे
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय हिंगोली

**********

गोषवारा :—

तत्वज्ञानाचा अभ्यास करत असताना भारतीय तत्वज्ञानच्या काही महत्वपूर्ण व्याख्यांचा अभ्यासकेला जातो. तत्वज्ञानाच्या प्रमुख व्याख्यांपैकी एक व्याख्या म्हणजे 'तत्त्वज्ञान हे सर्व शास्त्रांचे शास्त्र आहे.'ही होय. म्हणजेच तत्वज्ञानाचा अभ्यास करू गेल्यास त्याचा फक्त वरवरचा अभ्यास करून ते कधीही एखाद्याच्या गळी उतरवता येत नाही. तत्त्वज्ञानाचा अभ्यास म्हणजे मुलगामी,, मूलभूत अभ्यास होय. एखाद्या गोष्टीच्या मुळाशी जाऊन त्याची उकल करणे होय. ते करत असताना त्याचे काही मूलभूत तत्त्व आहेत. त्या तत्वांच्या आधारे तत्वज्ञान अभ्यासावे तसेच वर म्हटल्याप्रमाणे तत्त्वज्ञानाच्या काही मूलभूत शाखा आहे. त्या म्हणजे नीतिशास्त्र, सत्ता शास्त्र आणि ज्ञानशास्त्र होय. तत्वज्ञानाच्या या प्रमुख शाखांच्या माध्यमातून असंख्य अशा मूलभूत संकल्पनांची उकल केली जाते. मानवी आचरण, ईश्वर, मूलत: विश्वाचे आधारभूत कारण तसेच विज्ञानाच्या उत्पत्ती संबंधी सविस्तर चर्चा या शाखेच्या माध्यमातून होते.

यापैकी विज्ञानशास्त्र म्हणजे ज्ञानाची उत्पत्ती, विकास, मर्यादा आणि त्यासंबंधीचे इत्यंभूत प्रश्न यांची चर्चा विज्ञान शास्त्रात केली जाते. याच दृष्टीकोनातून जर आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहिले तर प्रस्तुत शोधनिबंधात ज्या प्रमुख विषयांसंबंधी विषयाचे विश्लेषण होणार आहे त्याचा अन्वयार्थ आपल्या लक्षात येऊ शकेल. ज्ञानशास्त्र म्हणजे ढोबळ अर्थाने ज्ञानाचे उगमस्थान, ज्ञानाचे भांडार या अर्थाने प्रस्तुत शोधनिबंधात वरील सज्ञा योजिले आहे. कारण ज्ञान आणि बाबासाहेब आणि बाबासाहेबांनी ज्ञान हे अतूट असे समीकरणच आहे जणू. या पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ज्ञाननिष्ठा सर्वज्ञात आहे. ज्ञान म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे. अज्ञानातून ज्ञानाकडे जाणे. याच ज्ञान प्रक्रियेमुळे मानव हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा प्राणीगणला गेला आहे.मानवलाकशाचे तरी ज्ञान होते म्हणजे अथांग विश्वासंबंधी माहिती मिळते, जाणीव होते. मुळातच मानव हा जिज्ञासू, ज्ञानपिपासू प्राणी असल्यामुळे त्याची चिकित्सक बुद्धी त्याला शांत बसू देत नाही. म्हणून तो सातत्याने या विश्वास संबंधी चिकित्सक राहिला आहे. अशा ज्ञानी मानवा बद्दल प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून विचार केला जाणार आहे.

प्रस्तावना :—

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून महामानव, ज्ञानसूर्य, ज्ञानपिपासू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञानचिकित्से संबंधी चिकित्सा करण्यात येणार आहे. ज्ञान म्हणजे अज्ञाता संबंधीची ओढ, चिकित्सक बुद्धीजी डॉ. बाबासाहेबांकडे होते. त्यांनी संपूर्ण आयुष्यभर अखंड ज्ञानसाधना केली. म्हणून त्यांना ज्ञानसूर्य, ज्ञानपिपासू असे म्हटले जाते. त्यांच्या ठिकाणी ज्ञान मिळविण्याची आदम्यअशी इच्छा शक्ती होती. म्हणून ते म्हणतात'मी मरेपर्यंत विद्यार्थी राहणार आहे.'कारण ज्ञानलालसा हा विद्यार्थ्याचा सर्वोत्कृष्ट गुणअसतो. विद्यार्थ्याने सतत चिकित्सा केलीच पाहिजे. या मताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी व्यक्त केलेले मत फक्त मत नसे ते स्वत: त्या पद्धतीने आचरण करत असत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आत्यंतिक ज्ञानपिपासू वृत्ती विषयी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सविस्तर चिकित्सा करण्यात येणार आहे. सर्वसामान्यपणे माणूस हा या विश्वाच्या जडण घडणी विषयी सातत्याने जिज्ञासू राहिला आहे. त्याला सातत्याने सर्व विश्वासा संबंधी कुतूहल राहिले आहे. त्यायोगे माणसाने प्रगतीचे अत्युच्च शिखर गाठले आहे. पण याहून ही वेगळ्या प्रकारची आणि तीव्र जिज्ञासा आणि ज्ञानलालसा ज्याला आपण पराकोटीची जिज्ञासा असे म्हणू शकू तीज्ञानाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेबांच्या ठिकाणी पहावयास मिळते. अशी ज्ञानजिज्ञासाइतरत्र कोठे विरळाच पाहण्यास मिळू



Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq & Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

शब्दरूप म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाचे शीर्षक 'ज्ञानशास्त्र' अशा प्रकारचे देण्यात आलेले आहे. शिक्षणाबद्दलची त्यांची आंतरिक ओढ ही आपल्याला प्रकर्षाने जाणवते. यासंबंधी ही आपल्याला या ठिकाणी चिकित्सा करावयाची आहे. करण्यात येणार आहे.

**गृहितके :—**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतःच एक प्रगल्भ असे ज्ञानशास्त्र आहेत.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानसूर्य आहेत.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानसागर आहेत.

**उद्दिष्टे :—**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ज्ञान प्रच्चुरता सिद्ध करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्ञानीत्वसिद्ध करणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्ञानभांडार सिद्ध करणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्ञानपिपासूपण सिद्ध करणे.

**संशोधन पद्धती:—**

प्रस्तुत शोधनिबंधात साठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. कोणत्याही संशोधनासाठी एक किंवा दोन अशा विशिष्ट संशोधन पद्धतीची निवड करावी. प्रस्तुत शोधनिबंधात ही ती विश्लेषणात्मक पद्धती निवडली आहे.

**विषय विश्लेषण :—**

'जो वाघिणीचे दूध पितो तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' हे डॉक्टर बाबासाहेबांचे विधान त्यांनी स्वतः सुरुवातीला आजमावले किंवा प्रत्यक्षात आणले आणि नंतर त्यांनी दीनदलित समाजाला स्वानुभवावरून सांगितले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची ज्ञानलालसा ही पराकोटीची होती. म्हणून ते सर्वार्थाने ज्ञानसूर्य ठरतात. तत्वज्ञानाच्या अभ्यास करत असताना त्याच्या प्रमुख शाखांपैकी. एक म्हणजे 'ज्ञानशास्त्र'.ज्ञान— शास्त्रांमध्ये ज्ञानाच्या उत्पत्ती,उगम,विकास,सत्यत्व, असत्यत्व, ज्ञानाचे स्वरूप यासंबंधी सविस्तर चिकित्सा केली जाते. ज्ञान संकल्पनेचा अभ्यास चिकित्सक पद्धतीने केला जातो. ज्ञान म्हणजे नेमके काय? याचा विचार केला जातो. तसे पाहता 'ज्ञानसंकल्पना'ही एक अतिव्यापक संकल्पना आहे. माणसाला ज्ञान होण्याची प्रक्रिया मेंदू च्या माध्यमातून घडून येते असते.डॉ. बाबासाहेबांच्या बाबतीतही हेच घडत होते. पण इतरांपेक्षा त्यांची तीव्रता जास्त असल्याचे आपल्या लक्षात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनासंबंधी जेव्हा आपण चिकित्सक दृष्टिकोनातून पाहतो तेव्हा असे लक्षात येते की बालवयातील त्यांची ज्ञानलालसाही असामान्य कोटीतील होती. त्यांच्या बालपणाबद्दल यू. पी. इंगोले लिहितात,"भीमरावची वृत्ती लहानपणापासूनच धार्मिक असल्याने त्यांना पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली. व त्यातूनच अवांतर वाचनाचे वेड लागले. वेड एवढे भयंकर होते की अभ्यासक्रमातील पुस्तके वाचणे त्यांना कंटाळवाणे वाटे. अविश्रांत परिश्रम घेऊनही त्याचा परिणाम भविष्यात तल्लख बुद्धिमत्तेचा विद्यार्थी, चिकाटी, व ख्यातीप्राप्त असलेला भिमराव सर्वसाधारण मुलांसारखा७०० पैकी २८२ मार्क घेऊन महाराष्ट्रातील महारांचा एक अस्पृश्यांचा पहिला मुलगा म्हणून मॅट्रिक पास झाला. अवांतर वाचनाची एवढी गोडी जडली की पुढे पुढे उठताना,बसताना, प्रवास करताना, झोपताना त्यांच्या जीवनाचा क्षण न क्षण वाचण्यात व ग्रंथ सहवासात गेला.

डॉ. बाबासाहेबांच्या वाचन वेडा संबंधी जेवढे लिहिले गेले ते ही कमीच आहे असे म्हणावे लागेल. ते जेव्हा आवांतर वाचन करत असत तेव्हा त्यांना भूक तहान, वेळ काळ याचे भान उरत नसे. स्थळकाळाच्या मर्यादा रहात नसत. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे पुस्तके विकत घेण्यासाठी वडिलांकडे पैसे नव्हते. म्हणून एक वेळ त्यांच्या मोठ्या बहिणीने स्वतःचे दागिने गहाण ठेवून त्यांना पुस्तके विकत घेण्यासाठी पैसे दिले. पुस्तके किमान बघता तरी यावीत म्हणून ते ग्रंथालयात पाणी पिण्यास जात असत असे ते स्वतःसांगतात. एकदा वाचनाला बसले तर ते अठरा—अठरा तास अभ्यासात गढून गेलेले असत. घरच्या दिव्यावर वाचन करायचे तर तेल जास्त जळत असे. घरची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे तेल रात्र रात्र जाळणे त्यांना परवडत



SHIVAJI COLLEGE HINGOLI
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS)
Scanned with OKEN Scanner

नसे. मग त्यांनी यातून मार्ग काढण्यासाठी पथदिव्याखाली बसून रात्र रात्र अभ्यास केला. विद्या हेच माझे पहिले दैवत आहे असे ते म्हणत असत. ज्ञान मिळविण्यासाठी पडेल ते कष्ट करण्यास तयार असत. शिक्षण घेत असताना त्यांना कायम संकटांचा सामना करावा लागत असे. त्यात त्याकाळात स्पृश्यास्पृश्यता अति प्रमाणात असल्यामुळे त्यांना ते अधिक प्रमाणात जाणवत असे. अगदी लहानपणी शाळेत गेल्यानंतर त्यांना सोबतच्या विद्यार्थ्यांकडून मार दिला जायचा. कारण एकच ते अस्पृश्य होते. कधीकधी ते वर्गात गेले की त्यांचे सहकारी त्यांचे दप्तर फेकून देतअसत. त्यांना चिडवत असत. तो जर वर्गात आला तर आम्ही वर्गात बसणार नाही म्हणत असत. मुंबईला शिक्षणासाठी गेले तेव्हा त्यांचे लग्न झालेले होते.तेव्हा त्यांचे वय अवघे १४ वर्ष एवढे होते. रमाबाई सुद्धा लहान होत्या. डॉ. आंबेडकरांच्या शाळा कॉलेजला जाण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे पैसे नसतात. म्हणून रमाबाईला काळजी वाटत असे. असाच एक प्रसंग या ठिकाणी त्यांनी व्यक्त केला आहे. ''एकदा मी कॉलेजमध्ये जात असता छ्रेल्वेचा पास घरी विसरलो आणि त्याच दिवशी पासची तपासणी होती. तिकीट घेणाऱ्या मास्तर ने मला आडविले. जवळ तर एक दिडकी नव्हती. चार वाजेपर्यंत चर्चगेट स्टेशन वर बसून राहिलो होतो. नंतर कैकिनी नावाचा माझ्या वर्गातील विद्यार्थी तेथे आला. त्याने विचारले 'काय रे इथे कसा?' मी त्याला सर्व हकीकत सांगितली. त्याने चार आणे भरून माझी सुटका केली. व त्याच्या पैशाने तिकीट काढून त्याने मला घरी पाठवून दिले.

डॉ. बाबासाहेबांचे शिक्षण विषयक वेड अनन्यसाधारण होते. अनेक वेळा ते ग्रंथालयात अडकून पडत असत. त्यांना वाचनाची खूप आवड होती. वाचन करताना ते एकदा कां गढून गेले तर त्यांना वेळेचे भान कधीच राहात नसे. सर्व धर्मांचेधर्मग्रंथ, त्यावरील चिकित्सा, समीक्षा, हिंदूंची सर्व धर्मग्रंथ ज्यामध्ये वेद उपनिषदासहित इतर हजारो ग्रंथ या सर्वांचे वाचन करून त्यात जे अंधश्रद्धा आहे त्याचा निषेध त्यांनी सुरुवातीपासूनच केला. संत तुकारामांचे साहित्यही त्यांनी मनापासून वाचले. आत्मसात केले. आणि शेवटी त्यांना त्यांनी गुरु मानले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिसामान्यव्यक्ती डोळ्यासमोर ठेवून त्याच्या प्रगतीचा सतत विचार केला. त्यासाठी त्यांनी वाचन अत्यंत चौफेर पद्धतीने केले. शूद्रातिशूद्र, दलित, स्त्रिया या सर्वांचा त्यांना कळवळा होता. त्या दृष्टिकोनातून त्यांची वाटचाल सुरू होती. शिक्षणासाठी विदेशात गेल्यानंतर तेथेही त्यांचा हा नाद म्हणजे पुस्तके जमवून त्याचा फडशा पाडण्याचा नाद कमी झाला नाही. जेवणासाठी पैसे नसतील तर चालेल पण पुस्तके मिळाली पाहिजेत याबद्दलची आठवण सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्रकार धनंजय कीरम्हणतात, "ग्रंथ विकत घेण्याची आंबेडकरांची भूक नशमता ती वाढतच होती. वेळ मिळेल तेव्हा ते जुन्या ग्रंथांच्या दुकानातून भटकत असत. पोट बांधून ग्रंथ विकत घेण्याच्या वेडामुळे सुमारे दोन हजार जुन्या ग्रंथांचा त्यांच्याजवळ संग्रह झाला. ते ज्ञान भांडार भारतात नेण्यासाठी त्यांनी आपल्या एका मित्राच्या स्वाधीन केले. भारतात येईपर्यंत त्यातील बरेच ग्रंथ गहाळ होऊन उरलेसुरले त्यांच्या हाती आले.

अशा झपाटलेल्या माणसाने जन्मभर फक्त आणि फक्त ज्ञान संपादनचाच ध्यास घेतला. असे हे जगातील एकमेव उदाहरण ठरेल. या ज्ञान सूर्याने अखंड ज्ञान तपश्चर्या सुरूच ठेवली. त्यायोगे हा ज्ञान वेडा माणूस भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ठरला. त्याने अखंड ज्ञानलालसा जोपासल्यामुळे त्याला आयुष्यात अनेक प्रकारची संकटे आली. अस्पृश्यतेचे ओझे जगभर घेऊन ही व्यक्ती ज्ञान लालसेने वेडीपीशी झालेली आपल्या दिसून येते, त्यायोगे त्यांना प्रकांडपंडित असे म्हटले जाते.

डॉ. आंबेडकर यांच्यां चरित्राचा अभ्यास म्हणजेज्ञानसूर्याच्याराई एवढ्या तुटपुंज्या भागाचे दर्शन होय. त्यांची महानता त्यांच्या कार्यावरून, त्यांच्या ठिकाणी असलेल्याअस्पृश्यांप्रतीच्या तळमळी वरून दिसून येते. म्हणून ते एक स्वत:च स्वत: मध्ये ज्ञानसूर्य, 'ज्ञानशास्त्र' आहेत हे स्पष्ट आहे. जगाच्या ज्ञाना पैकी बव्हांश ज्ञान त्यांनी अवगत केलेलेच असावे. म्हणूनच त्यांना प्रकांडपंडित असे म्हटले जाते. अचाट अशा प्रकारच्या ज्ञान जिज्ञासेमुळे त्यांनी आपले स्वत:चे असे एक आढळ स्थान सर्वसामान्यांमध्ये निर्माण केले आहे. त्यांच्या विजिगीषू वृत्ती मुळे ते ज्ञानमहर्षी ठरले आहेत.



SHIVAJI COLLEGE HINGOLI
T.C.
Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq & Dist. Hingoli (MS.)

असा एखादा विषय क्वचितच सापडेल की ज्या विषयाची चिकित्साडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली नाही. अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, तत्वज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, सामाजिक विचारवंत, साहित्यिक, नाटककार, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे अनेक क्षेत्र त्यांनी ढवळून काढल्याचे आपल्या लक्षात येते. डॉ.'बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणावरील प्रेम असे अनन्यसाधारण होते.

**निष्कर्ष :—**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाचन वरील प्रेम हे अनन्यसाधारण होते.

२) स्त्रीशूद्रांसाठी त्यांनी केलेले कार्य अजोड अशाप्रकारचे आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत: स्वत: मध्ये स्वतंत्र एकज्ञानशास्त्र होते.

४) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दीनदुबळ्यांची कैवारी होते.

**संदर्भसूची :—**

१) ग्रंथ वेडे आंबेडकर, लेखकयू. पी. इंगोले आशिष प्रकाशन यवतमाळप्रकाशन वर्ष २००४ पृष्ठ क्रमांक ३.

२) तत्रैव प्रश्न क्रमांक १५.

३) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, लेखक धनंजय कीर पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृष्ठ क्रमांक ३५.

□□□

SHIVAJI COLLEGE HINGOLI

28

# कृषीविधेयक—२०२० आणि शेतकरी आंदोलनाचाएक चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. मधूकर बाबूराव अनंतकवळस
प्रोफेसर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, जि. सोलापूर

*********

**गोषवारा —**

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान असून आजही देशातील बहुसंख्येने लोकसंख्या शेती व सेतीपुरक व्यवसायावर अवलंबून आहे. तरीही शेतीसाठीची धोरणे असणारी सध्याची धोरणे शेतीस व अवलंबून असणाऱ्या लोक संख्येस पोषक दिसत नाहीत कारण अजूनही शेतमाल किमतीचे, आवश्यक असणाऱ्या विजेचे प्रश्न, निर्यातीचे प्रश्न, सब्सिडीचे प्रश्न, शेती उपयुक्त असणारे विविध प्रश्न, सोयीनुसार सरकारची बदलती धोरणे, शेती विम्याचे प्रश्न असे अनेक प्रश्न आहेत. विविध प्रश्नानी अडचणीत असतानाच सरकारने नवीनच तीन कायदे आणले. सरकारच्या दृष्टीने हे कायदे शेतकर्यास अनुकूल वाटत असले तरी शेतकऱ्यास हमी भावाचा व अत्यावश्यक वस्तू साठा कायदा भविष्यात अडचणीचा वाटत असल्यानेच शेतकऱ्यानी आंदोलनाचा मार्ग अवलंबिला आहे. दिल्ली येथे संयुक्त किसान मोर्चा या संघटनेच्या नावाखाली पंजाबमधील ३३ किसान युनियन्स, अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समिती व देशभरातून १५ राज्यातील शेतकरी संघटनाच्या वतीने सुरु असलेल्या ' डेरा डालो ' या शेती विरोधी कायद्याच्या विरोधातील आंदोलनाला साडेचार महिन्यापेक्षा जास्त दिवस झाले आहेत. हे शेतीविषयक कायदे ज्या पद्धतीने संसदेत पारित केले गेलेत त्यामागची सरकारची भूमिकाच संशयास्पद आहे. या तीन कायद्यामुळे शेतीपद्धतीच्या मुळ स्वरुपात बदल करून कृषी क्षेत्राला व्यापारी रूप देऊन ते उद्योग पतीच्या हाती सोपविण्याचेच हे षडयंत्र आहे. अशी शेतकऱ्यांची



Scanned with OKEN Scanner